# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(क्रिडा व शारिरिक शिक्षण विभाग)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५


जावक क्रमांक/गो.वि.ग./ १०१ /२०२३ दिनांक : १७/०२/२०२३

## शिक्षक क्रीडा व कला महोत्सव २०२३

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांतील तसेच विद्यापीठीय शिक्षक कर्मचारी यांचेकरीता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे प्रथमच **शिक्षक क्रीडा व कला महोत्सव** आयोजीत करण्यात येत आहे.

सदर महोत्सवातील क्रीडा व कला प्रकाराकरीता शिक्षक कर्मचारी यांचेकडून उत्स्फुर्त प्रतिसाद प्राप्त झालेला असुन मोठ्या संख्येने विद्यापीठाकडे नोंदी झालेल्या आहेत. क्रीडा व कला प्रकार सुव्यवस्थित व नियोजनबद्ध पार पाडण्याच्या अनुषंगाने खेळाडू / स्पर्धकांकरीता पुढीलप्रमाणे क्रीडा व कला प्रकारांकरीता नियमावली ठरवून देण्यात येत आहे, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

## क्रीडा विषयक नियमावली

१) क्रीकेट, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन ह्या खेळांचे सामने झोन निहाय खेळविल्या जाणार असून प्रत्येक झोन मधुन विजेत्या एका संघास क्रीडा महोत्सवामध्ये अंतीम सामना खेळण्याची संधी दिली जाईल.
२) क्रिकेटचा प्रत्येक सामना १० षटकांचा राहील.
३) क्रिकेट सामना हेवी टेनिस बॉल ने खेळविल्या जाईल.
४) प्रत्येक संघातील नियमीत शिक्षक कर्मचारी यांनी स्वखर्चाने नियोजीत ठिकाणी खेळण्याकरीता वेळेत उपस्थित राहावे, अनुपस्थित राहील्यास संघ बाद ठरविण्यात येईल.
५) क्रीकेट, बॅडमिंटन व टेबल टेनिस या खेळांकरीता आवश्यक असलेले रॅकेट व बॅट स्वतः घेऊन यावे.
६) प्रत्येक संघातील कर्मचारी यांनी खेळाच्या ठिकाणी महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे मुळ ओळखपत्र व आधार कार्ड सोबत घेऊन यावे, नियमानुसार नियमीत शिक्षक कर्मचारी यांनाच संघात स्थान राहील, नियमांचे उल्लंखन केल्यास संघास बाद ठरविण्यात येईल.
७) स्पर्धा प्रभारी यांनी विद्यापीठाकडे नोंदणी केलेल्याच कर्मचाऱ्यांची ओळख पटवून त्यांना संघात स्थान द्यावे.
८) पंचाचा निर्णय अंतिम राहील.
९) प्रत्येक कर्मचारी यांनी खेळतांना खेळ भावनेतुन खेळावे.
१०) तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन तसेच नशा/धुम्रपान करण्यास सक्त मनाई असेल, तसेच प्रशासकीय कार्यवाहीस पात्र ठरतील.
११) खेळतांना इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी, इजा झाल्यास कर्मचारी स्वतः जबाबदार राहील.
१२) विद्यापीठामार्फत नियुक्त परिक्षकांच्या देखरेखी खाली सामने खेळविले जातील व त्याचा अहवाल वेळोवेळी क्रिडा व शारिरीक शिक्षण विभाग, गों.वि. गडचिरोली यांचे कडे सादर करण्यात येईल.

## सांस्कृतीक कार्यक्रमांची नियमावली

**समुह गित गायन -**

१) समुह गित गायन स्पर्धेमध्ये भाग घेणारे स्पर्धक हे विद्यापीठ/संलग्नीत महाविद्यालयांतील शिक्षक कर्मचारी असावे.
२) समुह गित मराठी किंवा हिंदी भाषेतील असावे.
३) समुहामध्ये कमीत कमी ४ व अधिकाधीक २० स्पर्धक असावेत.
४) समुह गित गायणाकरीता अधिकाधीक ०७ मिनीटे वेळ देण्यात येईल.
५) समुह गिताचे सादरीकरण करण्याकरीता कराओके ट्रॅकचा वापर करता येणार नाही.
६) समुह गितामध्ये व्दिअर्थी, वल्गर किंवा कुठल्याही राजकीय पक्षासंबंधीत गित सादर करता येणार नाही.
७) आयोजकांतर्फे गितांच्या साथसंगतीकरीता वाद्यासंबंधीची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
८) परिक्षकांचा निर्णय अंतीम राहिल. स्पर्धकांस कुठल्याही प्रकारे स्पर्धेच्या निकालास आव्हान करता येणार नाही.
९) परिस्थितीनुसार कोणत्याही नियमात किंवा कार्यक्रमाच्या रुपरेषेत ऐनवेळी बदल करण्याचे संपुर्ण अधिकार आयोजकांकडे राहिल.
१०) स्पर्धकांनी कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास किंवा नियमांचे पालन न केल्यास तसेच परिक्षकांचा अनादर केल्यास त्यांना स्पर्धेतुन बाद करण्यात येईल.

**एकल गित गायन -**

१) एकल गित गायन स्पर्धेमध्ये भाग घेणारे स्पर्धक हे विद्यापीठ/संलग्नीत महाविद्यालयांतील शिक्षक कर्मचारी असावे.
२) एकल गित मराठी किंवा हिंदी भाषेतील असावे.
३) एकल गित गायणाकरीता अधिकाधीक ०५ मिनीटे वेळ देण्यात येईल.
४) एकल गिताचे सादरीकरण करण्याकरीता कराओके ट्रॅकचा वापर करता येणार नाही.
५) एकल गितामध्ये व्दिअर्थी, वल्गर किंवा कुठल्याही राजकीय पक्षासंबंधीत गित सादर करता येणार नाही.
६) आयोजकांतर्फे गितांच्या साथसंगतीकरीता वाद्यासंबंधीची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
७) परिक्षकांचा निर्णय अंतीम राहिल. स्पर्धकांस कुठल्याही प्रकारे स्पर्धेच्या निकालास आव्हान करता येणार नाही.
८) परिस्थितीनुसार कोणत्याही नियमात किंवा कार्यक्रमाच्या रुपरेषेत ऐनवेळी बदल करण्याचे संपुर्ण अधिकार आयोजकांकडे राहिल.
९) स्पर्धकांनी कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास किंवा नियमांचे पालन न केल्यास तसेच परिक्षकांचा अनादर केल्यास त्यांना स्पर्धेतुन बाद करण्यात येईल.

**लघु नाटिका -**

१) लघु नाटिका स्पर्धेमध्ये भाग घेणारे स्पर्धक हे विद्यापीठ/संलग्नीत महाविद्यालयांतील शिक्षक कर्मचारी असावे.
२) लघु नाटिक ही मराठी किंवा हिंदी भाषेतीलच असावी.
३) लघु नाटिका सादरीकरणाकरीता १२ मिनीटांचा वेळ दिल्या जाईल
४) लघु नाटिकेमध्ये नाटिकेतील पात्राप्रमाणे व्यक्तींची संख्या घेता येईल परंतु नाटिकेव्यतीरिक्त व्यक्तींची उपस्थिती मंचावर ठेवता येणार नाही.
५) लघु नाटिका हे व्दिअर्थी, वल्गर किंवा कुठल्याही राजकीय पक्षासंबंधीत कृतीवर सादर करता येणार नाही.
६) परिक्षकांचा निर्णय अंतीम राहिल. स्पर्धकांस कुठल्याही प्रकारे स्पर्धेच्या निकालास आव्हान करता येणार नाही.
७) परिस्थितीनुसार कोणत्याही नियमात किंवा कार्यक्रमाच्या रुपरेषेत ऐनवेळी बदल करण्याचे संपुर्ण अधिकार आयोजकांकडे राहिल.
८) स्पर्धकांनी कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास किंवा नियमांचे पालन न केल्यास तसेच परिक्षकांचा अनादर केल्यास त्यांना स्पर्धेतुन बाद करण्यात येईल.

**एकपात्री नाटिका -**

१) एकपात्री नाटिका स्पर्धेमध्ये भाग घेणारे स्पर्धक हे विद्यापीठ/संलग्नीत महाविद्यालयांतील शिक्षक कर्मचारी असावे.
२) एकपात्री नाटिका ही मराठी किंवा हिंदी भाषेतीलच असावी.
३) एकपात्री नाटिकेमध्ये सादरीकरण कर्त्या एकाच कलाकाराची उपस्थिती मंचावर राहिल.
४) एकपात्री नाटिकेच्या सादरीकरणाकरीता ०७ मिनीटांचा वेळ दिल्या जाईल
५) एकपात्री नाटिका हे व्दिअर्थी, वल्गर किंवा कुठल्याही राजकीय पक्षासंबंधीत कृतीवर सादर करता येणार नाही.
६) परिक्षकांचा निर्णय अंतीम राहिल. स्पर्धकांस कुठल्याही प्रकारे स्पर्धेच्या निकालास आव्हान करता येणार नाही.
७) परिस्थितीनुसार कोणत्याही नियमात किंवा कार्यक्रमाच्या रुपरेषेत ऐनवेळी बदल करण्याचे संपुर्ण अधिकार आयोजकांकडे राहिल.
८) स्पर्धकांनी कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास किंवा नियमांचे पालन न केल्यास तसेच परिक्षकांचा अनादर केल्यास त्यांना स्पर्धेतुन बाद करण्यात येईल.

डॉ. अनिता लोखंडे
संचालक, क्रीडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव -

1) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली